N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0968 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 21/10/2024 22:09

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन **Date From (दिनांक पासून):** 26/09/2024

**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/10/2024

**Time From (वेळेपासून):** 14:41 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 15:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 21/10/2024 **Time (वेळ):** 21:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 060

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 21/10/2024 21:29 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 3 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वस्तु व सेवा कर कार्यालय राज्,कोल्हापूर जीएसटी भवन कोल्ह

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): नितीन राजेंद्र बदी
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1999
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | जवाहरनगर कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | जवाहरनगर कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8237819017

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | निवास श्रीपती पाटील | | | 1. कोलोली ता पन्हाळा जि कोल्हा,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रुपये दराच्या 50 भारतीय चलनी नोटा | 25,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

25,000.00

**11. Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 21/10/2024

मी नितीन राजेंद्र बदी, वय 25 वर्षे, व्यवसाय - ऑईल आणि ग्रीस रिपॅकींग, रा. प्लॉट नंबर 14, रामचंद्र निवास, लक्ष्मी वसाहत, जवाहरनगर कोल्हापूर, मो.नं.8237819014 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 26/09/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागितली की, मी वरील ठिकाणी राहणेस असून माझे वडील राजेंद्र रामचंद्र बदी यांनी सन 1988 सालापासुन मुंकुद पेट्रोकेम इंडस्ट्रीज, जवाहरनगर कोल्हापूर येथे ऑईल आणि ग्रीस रिपॅकींग करण्याची कंपनी आहे. सदरची कंपनी वडीलांचे नावे आहे. सदर कंपनीमार्फत आम्ही व्यवसाय करतो. त्यांचे व्यवसायात मी सुध्दा त्यांना मदत करतो. आमचे वरील कंपनीचा जी. एस.टी क्रमांक 27।थ्भ्च्ठ0456र्त्16 असा आहे. आमचे कंपनीचे जे काही व्यवहार होतात त्याची ज्या त्या वेळी आम्ही फाईल करून जीएसटी डिटेलची पुर्तता करीत असतो.जुन 2024 मध्ये माझे वडील राजेंद्र यांना आमचे कंपनीबाबत जी.एस.टी.विभाग कोल्हापूर येथुन निवास पाटील यांनी आमचे कंपनीमध्ये सन 2020-2021 मध्ये जी.एस.टी.विभागाचे नियमाप्रमाणे कागदपत्रे तसेच रजिस्टर आहेत अगर कसे याबाबत नोटीस पाठविली होती. त्याबाबत मी तसेच वडील राजेंद्र असे जी.एस.टी.विभाग कोल्हापूर येथे जावुन निवास पाटील यांना चार ते पाच वेळा भेटलो. त्यावेळी ते प्रत्येकी वेळी वेगवेगळी डॉक्युमेंट घेवुन या असे म्हणुन आम्हाला परत पाठवित होते. मी व वडील राजेंद्र यांनी निवास पाटील साहेब यांचेकडे त्यांनी मागणी केलेप्रमाणे सर्व कागदपत्रे दिलेली आहेत. त्यानंतर निवास पाटील यांनी दिनांक 12/09/2024 रोजी आमच्या कंपनीस भेट दिली. त्यावेळी त्यांनी आम्हाला बँक स्टेटमेंन्ट घेवुन दिनांक 23/09/2024 रोजी ऑफीसला बोलविले होते. त्याप्रमाणे मी व वडील राजेंद्र असे जी.एस.टी. ऑफीस कोल्हापूर येथे जावुन पाटील साहेब यांना भेटलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी कंपनीचा बँक अंकाऊंट नंबर जी.एस.टी.पोर्टल ला तुम्ही अपडेट केलेला नाही. तसेच बॅलेन्स शिट मधील क्रेडीटर्स डिटेल्स पुर्ण दिलेल्या नाहीत. या दोन गोष्टीसाठी मी तुम्हाला जी.एस.टी. च्या नियमाप्रमाणे अंदाजे दिड ते दोन लाख रूपये दंड व त्यावरील व्याज असे मिळुन दोन ते अडीच लाख रूपये दंडाची नोटीस काढणार आहे असे म्हणाले. त्यावेळी आम्ही त्यांना कागदपत्राची पुर्तता करतो असे म्हणालो असता, निवास पाटील यांनी आम्हाला तुम्हाला दोन लाख रूपये दंडाची नोटीस नको असेल तर, तुम्ही मला 25,000/- रूपये दयावे लागतील, तुम्ही जर 25,000/- रूपये दिले तर मी तुम्हाला दंडाची नोटीस काढणार नाही व हा विषय मी बंद करून टाकतो असे म्हणाले. त्यावेळी मी व वडील राजेंद्र यांनी पंचवीस हजार रूपयांमध्ये काहीतरी कमी करा, असे म्हणालो असता त्यांनी पैसे कमी करण्यास नकार देवुन दिनांक 28/09/2024 रोजीच्या आधीपर्यंत पैसे घेवुन या. पैसे घेवुन आला नाहीतर दंडाची नोटीस काढणार असे सांगितले. त्यावेळी आम्ही त्यांना पैशाची जुळणी करून परत तुम्हाला भेटतो असे सांगुन तेथुन निघुन आलो. जीएसटी अधिकारी निवास पाटील हे आमचेकडे मागणी करीत असलेले 25,000/-रू. लाच म्हणुन मागणी करीत असलेची आमची खात्री झाली, परंतु त्यांना लाच रक्कम देणेची आमची ईच्छा नाही. यापुर्वी जीएसटी अधिकारी निवास पाटील यांचेशी माझे कोणतेही देवाण घेवाणीचे व्यवहार नाहीत. तसेच माझा आणि त्यांचा कोणताही वाद नाही. मी आज दिनांक 26/09/2024 रोजी निवास पाटील यांना भेटण्यास जाणार असुन त्यांचेवर योग्य ती कारवाई व्हावी म्हणुन तक्रार सांगुन माझा तक्रारी अर्ज त्यांचेकडे दिला. त्यावेळी त्यांनी त्यांचेकडील पोलीस निरीक्षक आसमा मुल्ला यांना बोलावुन घेवुन, त्या पुढील कारवाई करतील असे सांगितले. त्यावेळी मी मुल्ला मॅडम यांना माझी वरीलप्रमाणे तक्रार सांगितली. मुल्ला मॅडम यांनी उप वन संरक्षक, प्रादेषिक कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर या कार्यालयाकडुन दोन षासकिय पंचांना बोलावुन घेतले होते. तसेच त्यांचे कार्यालयातील सापळा पथकासाठी अमंलदार बोलावुन घेतले. त्यानंतर त्यांचेषी व पंचांषी माझी ओळख करून देवुन मला माझी तक्रार पंचांना सांगणेस

सांगितली. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारी अर्जावर मुल्ला मॅडम व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी पुढील कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरोचे ऑफीसमधुन करण्याचे आहे असे सांगुन, त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हांला देवुन, जीएसटी विभाग कोल्हापूर येथील निवास पाटील यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने सर्वांना पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 हवालदार यांना निवास पाटील साहेब यांना भेटणेकरीता पाठविले. त्यावेळी मी व पंच नं.01 हवालदार असे माझे मोटर सायकल क्रमांक डभ्-09-।ै-8542 वरून जी.एस.टी.विभाग कोल्हापूर कार्यालयात गेलो त्यावेळी निवास पाटील हे कार्यालयात नव्हते म्हणुन, त्यांचा मो.नं. 9766856251 वरती माझे वरील मोबाईल क्रमांकवरून फोन लावला असता, त्यांनी ते लंच करायला गेलेचे सांगुन थोडयावेळात येत असल्याचे सांगितले. थोडयावेळाने पाटील साहेब कार्यालयात आले. त्यावेळी मी त्यांना भेटलो त्यावेळी आमचेत आमचे कपंनीचे कामाचे तसेच जी.एस.टी.विभागात कशी कागदपत्रे जमा करायची असतात व आम्हाला आलेल्या नोटीसचे अनुषंगाने बोलने झाले. त्यावेळी मी निवास पाटील यांना खर आमच ना हे बारक हाय...असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी मी सांगतोय काय तुमची केस सिलेक्टच व्हायला नको पाहिजे होती.कारण का एवढ पंधरा लाख आणि सोळा लाख टर्नओवरची प्रोसेस सिलेक्ट व्हायची काय गरज नव्हती...असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पप्पा बाहेरगावी गेले असुन पप्पाना मी पाटील साहेब आणि मी बघुन घेतो असे म्हणाल्याचे सांगितले. त्यावेळी निवास पाटील यांनी जवाच्या तवा बोलयच मग... तुम्ही वीस म्हणला की, मी चाळीस वर यायच... मग तुम्ही तीस म्हणायच, पत्तीस पर्यत आस करत मी जे हाय ते योग्य सांगायच, आणि ते पण जमत नसेल तर मी तुमच्या पाठीमाग लागणार नाही किंवा तुम्हाला करा पण म्हणणार नाही असे म्हणाले. त्यावेळी मी नाही त्यांना तेच म्हणलो आता साहेब जे दाखवाय लागल्यात त्यांनी जे म्हणले ते सगळ आपण प्रावाईट केलो... असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी नाही माझ तेच म्हणन हाय, ते हित जर स्वाल केल कणाय पेपर हित आले कणी आता कस झालय साहेब की, ऑनलाईन सगळ काम असे म्हणाले. त्यानंतर आमचेत पुन्हा माझे कामाचे अनुषंगाने चर्चा झाली त्यावेळी मी निवास पाटील यांना थोडस पंचवीस हजार लय होत्यात हो साहेब असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी नाही सर नाही सर मी तुम्हालाही सांगितल तस मी त्या दिवशी क्लियर केलय सगळ, तुम्ही तस करत असला तर या आणि संपवुन टाकु आपण असे म्हटले. त्यावेळी मी तिज्या खाली पंचवीस हजारच्या खाली होणार नाही असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी सर नाही तस करू नका, मी जास्त सांगायलाच नाही साहेब तुम्हाला, मी सांगु शकतो असे म्हणाले. त्यावेळी मी हं .हं. असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी मी सांगु शकतो, मी तुम्हाला तुमच्या समोर हेच बॅक अॅमेटमेंटच मॅटर पेनाल्टी किती शो कॉज मी तुम्हाला पन्नास हजार अॅड केल असत, पण मी कस हाय माहिती हाय का किरकोळ मॅटर, जे नजरचुकीन राहिलेल हाय असे म्हणाले. त्यावेळी मी हं असे म्हणालो. त्यावेळी आमचेत कंपनीचे कामाचे अनुषंगाने बोलने झाले त्यावेळी पाटील साहेब यांनी मला तेला आता जी झालयं ते झालं आणि त्यामुळ कसं हाय मी जे बोललोय ते योग्यच हाय, आणि ते तर तुम्ही करा, हा विषय झालता, मी एकदा तुमच्या पेपर वर माझा ऑनलाईन अर्ज असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना आजच्या आज काय आसलं ते आपण करूया... असे म्हणुन कागदपत्रे पुर्तता केलेनंतर काय काय प्रोसेस आहे याबाबत बोलने केले. त्यानंतर मी माझं म्हणजे कितीला करतो काय बोललो नाही, तुम्ही जावा निवांत काय आसल ते साहेब आणि मी बघुन घेतो आणि येतो, अ कवा येवु मग उदया... असे विचारले. त्यावेळी निवास पाटील यांनी उदया मी सुटटीवर हाय, आजच आल तर बर होईल असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना साडेचार च्या दरम्यान येतो असे म्हणालो. त्यानंतर मी व पंच तेथुन निघुन ऑफीसमध्ये येवुन मुल्ला मॅडम यांना सर्व हकीकत सांगितली. जीएसटी अधिकारी निवास पाटील यांनी माझे ऑईल कंपनीचे बॅंक अकांउट नंबर पोर्टल ला अपडेट केलेले नाही बॅलन्स षीट मधील क्रेडीटर्स पुर्ण केलेले नाही याकरिता दंडाची नोटीस काढणार असून नोटीस न काढण्यासाठी 25000/-रु. मागणी केल्याचे व लाच रक्कम लगेच घेवून येण्यास सांगितलेचे पडताळणी कारवाई मध्ये निष्पन्न झाले.

त्यानंतर लागलीच मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅंथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये माझे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवले. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी रेकॉर्डर सुरू करून माझेकडे दिले व त्यांचे सुचनेवरून मी व पंच नं.01 हवालदार माझे मोटरसायकलने निघालो. माझे पाठोपाठ मुल्ला मॅडम, सापळा पथक, पंच नं.2 कांबळे आले व जीएसटी विभाग कार्यालय कसबा बावडा परिसरात सापळा लावुन थांबले. त्यावेळी मी व पंच जीएसटी कार्यालयाचे बेसमेन्टमध्ये जात असताना मला निवास पाटील भेटले त्यांनी मला वरच्या मजल्यावरून जावुन येतो असे म्हणाले त्यावेळी मी व पंच त्यांचे केबीनमध्ये जावुन बसलो. थोडयावेळाने पाटील साहेब तेथे आले त्यावेळी आमचेत अनोपचारक बोलने झाले त्यावेळी मी पाटील साहेबांना किती दिवसांनी लेटर भेटणार या बाबत विचारणा केली. त्यावेळी निवास पाटील यांनी दोन चार दिवसात मिळणार असे म्हणाले. त्यावेळी आमचेत कामाचे अनुषंगाने त्याची प्रोसे काय आहे याबाबत बोलने

झाले. त्यावेळी मी माझे पैसे असलेल्या खिशाकडे हात करत पैसे देवुन आम्हाला लगेच मिळणार असेल, तर हित
पाच फिर्याद दिनांक - 21/10/2024

मी नितीन राजेंद्र बदी, वय 25 वर्षे, व्यवसाय - ऑईल आणि ग्रीस रिपॅकींग, रा. प्लॉट नंबर 14, रामचंद्र निवास, लक्ष्मी वसाहत, जवाहरनगर कोल्हापूर, मो.नं.8237819014 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देतो की,

मी दिनांक 26/09/2024 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांना समक्ष भेटुन माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार सागिठेवायच आणि असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी नाही असे सांगुन त्याबाबतची प्रोसेजर सांगितली. त्यावेळी निवास पाटील यांना कोणाचा तरी फोन आला त्यांनी फोनवर बोला की अवनिश ओके ओके ठिक आहे असे म्हणुन फोन ठेवुन दिला. त्यावेळी त्यांनी मला मी जरा वरती जावुन येवू जावू असे विचारले. त्यावेळी मी त्यांना थांबु काय असे विचारले. त्यावेळी निवास पाटील यांनी तयार करूनच फोन करतो की तुम्ही त्यानंतरच या असे म्हणाले. त्यावेळी मी घेवुन आलोय दिलो असतो असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी ठिक आहे ते तयार करायला लागतय असे म्हणाले. त्यावेळी मी पप्पांनी लेटर घे आणि मगच दे असे सांगितले, मग दोन दिवस लागणार असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील यांनी होय दोन चार दिवस लागणार, मग मी तुम्हाला फोन करतो की, मग त्याच वेळी तुम्ही हे करा असे म्हणाले. त्यावेळी मी बर चालतय काही प्रॉब्लेम नाही... असे म्हणालोत्र. त्यानंतर मी व पंच तेथुन निघुन कार्यालयाचे बाहेत आलो. त्यावेळी माझे पाठोपाठ मुल्ला मॅडम, पंच नं.2 व सापळा पथक असे आले. आम्ही सर्वजण अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यालयात आलो त्यावेळी मी घडलेली हकीकत मुल्ला मॅडम यांना सांगितली. निवास पाटील साहेब यांनी ते कामपुर्ण होणेस चार दिवस लागणार असुन काम पुर्ण झालेनंतर ते मला फोन करणार आहेत त्यावेळी पैसे दया असे म्हणाल्याचे निष्पन्न झालेने चालु कारवाई मुल्ला मॅडम यांनी तात्ुपरती स्थगित केली व निवास पाटील यांचा मला जेव्हा फोन येईल किंवा निरोप येईल तेव्हा पुढील कारवाई करण्याचे सर्वमिते ठरले. त्यानंतर काही दिवसानी मला निवास पाटील यांनी मेल करून काही कागदपत्रे सादर करणेस सांगितली त्याप्रमाणे मी कागदपत्रे संबमिट करीत होतो. त्याबाबत वेळोवेळी मी मुल्ला मॅडम यांना कळवित होतो. त्यानंतर दिनांक 09/10/2024 रोजी निवास पाटील यांनी मेल करून इन्टीमेंशन ऑफ ऑडीट फांइन्डीग्ज झालेबाबत कळविले. त्यानंतर मी निवास पाटील यांना भेटायला जाणेबाबत ठरविले होते परंतु मी माझे घरगुती कामामुळे येता आले नाही. दिनांक 21/10/2024 रोजी मला मुल्ला मॅडम यांनी फोन करून जीएसटी अधिकारी निवास पाटील यांचेवरील पुढील कारवाईकरीता त्यांना भेटण्यास कधी जाणार आहे याबाबत विचारणा केली असता मी त्यांना आज दिनांक 21/10/2024 रोजी येत असल्याचे सांगितले. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी मला कावळा नाका कोल्हापूर येथे दुपारी 01.00 वा चे सुमारास येण्यास सांगितले.

दिनांक 21/10/2024 रोजी दुपारी 01.00 वा चे सुमारास मी कावळा नाका कोल्हापूर येथे आलो. त्यावेळी तेथे मुल्ला मॅडम, दोन्ही पंच हवालदार व झाोडगे तसेच सापळा पथकातील कर्मचारी असे हजर होते. त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना देवून सापळा पुर्व संपुर्ण कार्यवाही केलेनंतर अॅथ्रासिन लावलेले 25,000/- रूपये माझे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशामध्ये ठेवले. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी रेकॉर्डर सुरू करून माझेकडे दिले व त्यांचे सुचनेवरून मी व पंच नं.01 हवालदार माझे मोटरसायकलने निघालो. माझे पाठोपाठ मुल्ला मॅडम, सापळा पथक, पंच नं.2 झोडगे आले व जीएसटी विभाग कार्यालय कसबा बावडा परिसरात सापळा लावुन थांबले. मी व पंच जीएसटी कार्यालयात आत गेलो त्यावेळी तेथे पाटील साहेब नव्हते म्हणुन तेथे विचारणा केली असता ते जेवायला गेले असल्याचे समजल्याने मी त्यांचे केबीनमध्ये वाट पाहत बसलो. त्यानंतर काहीवेळाने पाटील साहेब तेथे आले त्यावेळी आमचेत माझे मित्राचे फॅब्रिकेशनच वर्क चे बाबत बोलने झाले. त्यावेळी मी तर ते सगळ झिरो झिरो झालेल तुम्ही केलाय काम, दिवाळी पण आलेल ठिवुन पण काय कराव बोलो , दिवुन टाकुया तुमच...असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील चालतय की चालतय की, हित ठिवुन दया...असे म्हणुन एक फाईल उचलली व पैसे ठेवण्यास सांगितले. त्यावेळी मी खाली...असे म्हणालो. त्यावेळी निवास पाटील हं.. असे म्हणाले. त्यावेळी मी मोजुन घ्या...असे म्हणुन माझेकडील 25,000/- रूपये टेबलवरती ठेवले त्यावेळी निवास पाटील यांनी त्यावर एक फाईल ठेवली व चालेल की, मी ते आज अॅप्रुवल ला पाठवुन मॅडमच येईल अॅप्रुवल... असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांचे केबीनमधुन बाहेर आलो. त्यावेळी निवास पाटील हे ही त्यांचे केबीनमधुन बाहेर आले त्यावेळी मी पैसे स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला असता मुल्ला मॅडम व त्यांचा स्टाफ व पंच नं. 2 झोडगे तेथे आले निवास पाटील यांना ताब्यात घेतले त्यावेळी मुल्ला मॅडम यांनी त्यांना लाच रक्कम कोठे आहे याबाबत विचारणा केली असता त्यांनी लाच रक्कम त्यांचे केबीनमधील मधील टेबलवर एका फाईलचे खाली असल्याचे सांगितले. त्यानंतर मुल्ला मॅडम यांनी सदर लाच रक्कम ताब्यात घेवुन सदर ठिकाणी लाचेच्या

सापळयातील प्राथमिक तपासण्या केल्या त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर कार्यालयात येवुन पुर्ण केली आहे.

माझे वडीलांचे नावे मुकुंद पेट्रोकेम इंडस्ट्रीज ही ऑईल आणि ग्रीस रिपॅकींग करण्याची कंपनी आहे. जुन 2024 मध्ये माझे वडीलांना आमचे कंपनीचे जीएसटी च्या अनुषंगाने जी.एस.टी.विभाग कोल्हापूर येथुन निवास पाटील यांनी आमचे कंपनीस सन 2020 -2021 मध्ये जी.एस.टी.विभागाचे नियमाप्रमाणे कागदपत्रे तसेच रजिस्टर आहेत अगर कसे याबाबत नोटीस पाठविली होती. त्याबाबत आम्ही वेळोवेळी कागदपत्रांची पुर्तता केलेली होती. मी व माझे वडील जी.एस.टी.ऑफीस कोल्हापूर येथे जावुन निवास पाटील यांना भेटलो. त्यावेळी निवास पाटील यांनी कंपनीचा बँक अंकाऊंट नंबर जी.एस.टी.पोर्टल ला अपडेट केलेला नाही, तसेच बॅलन्स शिट मधील क्रेडीटर्स डिटेल्स पुर्ण दिले नाहीत या दोन गोष्टीसाठी तुम्हाला जी.एस.टी.च्या नियमाप्रमाणे अंदाजे दिड ते दोन लाख रूपये दंड व त्यावरील व्याज असे मिळुन दोन ते अडीच लाख रूपये दंडाची नोटीस काढणार असे म्हणाले. त्यावेळी आम्ही त्यांना कागदपत्राची पुर्तता करतो असे म्हणालो त्यावेळी  निवास पाटील यांनी मला व वडीलांना तुम्हाला दोन लाख रूपये दंडाची नोटीस नको असेल तर तुम्ही मला 25,000/- रूपये दया, तुम्ही जर 25,000/- रूपये दिले तर मी तुम्हाला दंडाची नोटीस काढणार नाही, हा विषय मी बंद करून टाकतो. असे म्हणुन माझेकडे अप्रामाणिकपणे 25,000/-रू ची लाचेची मागणी करून, त्यांनी माझेकडुन  बेकायदेशीरपणे 25,000/- रूपये लाच स्विकारताना, त्यांना अॅन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर कडील पथकाने रंगेहाथ पकडल्याने माझी निवास श्रीपती पाटील, वय- 45 वर्षे, पद - राज्यकर अधिकारी, वर्ग -2, वस्तु व सेवा कर कार्यालय (राज्य) कोल्हापूर रा.ए - 605, रॉयल ऑस्टोनिया, न्यु पॅलेस मागे गेटजवळ, नागळा पार्क, कोल्हापूर, मुळ, रा. कोलोली, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द  कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी सांगितलेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन ती मी वाचुन पाहिली असता ती खरी व बरोबर आहे.

समक्ष

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.**२** मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

**or (**किंवा**)**

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):**
vishal dashrath mule
**Rank (**पद**):** SI (Sub-Inspector) **No.(**क्र.**):** psi
**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**):**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
शाहूपुरी पोलीस ठा..

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ajay janardan sindka
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PNMAH46135